आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
जून २०२५ - वार

**ठळक बातम्या**

- अहमदाबादमध्ये उड्डाणानंतर अवघ्या काही मिनिटात नागरी वस्तीत विमान कोसळलं, मृतांची ओळख पटवण्यासाठी DNA नमुने देण्याचं आवाहन

- एनडीआरएफ, CISF, लष्करासह स्थानिक यंत्रणांकडून मदत आणि बचाव कार्य सुरू, जगभरातून शोक व्यक्त, मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी १ कोटी रुपयांची मदत देण्याचा टाटा समुहाचा निर्णय

- मे महिन्यात किरकोळ महागाई दर ३ टक्क्यांच्या खाली, गेल्या ६ वर्षातली निचांकी पातळी

- जागतिक वातावरण आणि अमेरिका-इराण तणावामुळं शेअर बाजारात मोठी घसरण

**आणि**

- जागतिक क्रिकेट कसोटी स्पर्धेच्या अंतिम सामन्याच्या पहिल्या डावात ऑस्ट्रेलियाची दक्षिण आफ्रिकेवर ७४ धावांची आघाडी

**<><><><>**

अहमदाबाद विमानतळावरुन लंडनकडे उड्डाण केलेलं विमान अवघ्या काही मिनिटात अहमदाबाद विमानतळाच्या जवळ आज दुपारी कोसळलं. या विमानात प्रवासी आणि कर्मचारी मिळून २४२ जण होते. या दुर्घटनेत मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाल्याची भीती व्यक्त होते आहे. अहमदाबादमधलं बीजे वैद्यकीय महाविद्यालयाचं वसतीगृह, कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या इमारतीवर हे विमान कोसळलं. तिथे राहणारे लोकंही मृत्यूमुखी पडल्याची आणि जखमी झाल्याची शक्यता व्यक्त होते आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, गुजरातचे मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल यांनी थोड्याच वेळापूर्वी घटनास्थळाची पाहणी केली. या दुर्घटनेत जखमी झालेल्या ५० जणांवर नजिकच्या रुग्णालयात उपचार सुरु असल्याची माहिती गुजरातचे आरोग्य सचिव धनंजय द्विवेदी यांनी दिली.

- **होल्ड - गुजरात आरोग्य सचिव**

बोइंग ७८७ प्रकारचं हे विमान होतं. त्यात १६९ भारतीय नागरिक, ५३ ब्रिटीश, ७ पोर्तुगालचे आणि १ कॅनडाचा नागरिक होता. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी सुद्धा या विमानात होते. विमानातल्या कर्मचाऱ्यांमध्ये अपर्णा महाडीक, दीपक पाठक, मैथिली पाटील या महाराष्ट्रातल्या नागरिकांचा समावेश होता. दीवमध्ये राहणाऱ्या एका विमान प्रवाशाचा जीव या दुर्घटनेतून वाचला आहे.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झालं. एनडीआरएफ, CISF सह स्थानिक यंत्रणांनी घटनास्थळी मदत आणि बचाव कार्य सुरू केलं आहे. लष्कराच्या १३० अधिकारी आणि जवानांची तुकड़ीही घटनास्थळी मदत कार्यात सहभागी झाली आहे.

या अपघातामुळं अहमदाबाद विमानतळावरची वाहतूक काही काळासाठी स्थगित केली होती. अहमदाबाहून मध्यरात्री मुंबई आणि दिल्लीसाठी रेल्वे विशेष गाडी सोड़णार आहे. मुंबई सेंट्रलहून उद्या सकाळी अकरा वाजून १० मिनिटांनी एक गाडी अहमदाबादसाठी रवाना होणार आहे.

नागरिकांच्या मदतीसाठी हवाई वाहतूक मंत्रालय, एअर इंडिया, गुजरात सरकार यांनी हेल्पलाइन क्रमांक जाहीर केले आहेत. नागरिकांना ०७९-२३२-५१९००, ९९७८४०५३०४, ०११-२४६१०८४३ आणि ९६५०३९१८५९ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

**<><><><>**

अपघाताचं वृत्त कळल्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्वरित केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांच्याशी चर्चा केली आणि आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. राम मोहन नायडू यांनी थोड्याच वेळापूर्वी घटनास्थळाला भेट दिली आणि मदत तसंच बचाव कार्याचा आढावा घेतला. या घटनेची सखोल चौकशी केली जाणार असून दोषी असलेल्या सर्वांवर कारवाई केली जाणार असल्याचं नायडू म्हणाले.

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह जगभरातल्या नेत्यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. ही दुर्घटना दुर्दैवी असून विमान प्रवाशांप्रती संवेदना असल्याची प्रतिक्रिया राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी दिली आहे.

ही दुर्घटना अतिशय दुर्दैवी असून दुःख व्यक्त करायला शब्द अपुरे पडत असल्याची प्रतिक्रिया प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सर्व यंत्रणांना सज्ज राहण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. विमान सेवेच्या सुरक्षेकडे अधिक गांभिर्यानं लक्ष देण्याची गरज अजित पवार यांनी व्यक्त केली. तसंच विमानसेवेच्या सुरक्षेचा फेरआढावा घेण्याच्या सुचना विमान कंपन्यांना केल्या.

ही दुर्घटना हृदयद्रावक असल्याची प्रतिक्रिया विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दिली आहे. या दुर्घटनेमुळं काँग्रेसनं राज्यभरात आयोजित केलेले मशाल मोर्चे पुढचे २ दिवस स्थगित केले आहेत. माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनीही उद्या वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे.

ब्रिटनचे प्रधानमंत्री केईर स्टार्मर, रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्यासह जगभरातल्या नेत्यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबांना टाटा समुहानं प्रत्येकी १ कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. जखमींच्या उपचारांचा खर्चही समूह उचलणार असून बीजे महाविद्यालयाचं वसतीगृह देखील बांधून देणार आहे, अशी माहिती टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी दिली.

१२ ते १४ जून दरम्यानच्या प्रवासाची तारिख बदलायची असेल किंवा रद्द करायची असेल तर कुठलंही शुल्क न आकारण्याचा निर्णय एअर इंडियानं जाहीर केला आहे.

**<><><><>**

अन्नधान्याच्या दरात घट झाल्यामुळे मे महिन्यात देशातला किरकोळ महागाई दर २ पूर्णांक ८२ शतांश टक्क्यांवर घसरला.  सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी

मंत्रालयानं जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, फेब्रुवारी २०१९ नंतरचा हा सर्वात कमी वार्षिक महागाई दर आहे. एप्रिल महिन्यात हा दर ३ पूर्णांक १६ शतांश टक्के इतका होता.

**<><><><>**

येत्या उन्हाळी हंगामासाठी हरियाणा, उत्तर प्रदेश आणि गुजरातमधून किमान आधारभूत दरानं ५४ हजार १६६ मेट्रिक टन मूग खरेदी करायला, तसंच उत्तर प्रदेशातून ५० हजार ७५० मेट्रिक टन भूईमूग खरेदी करायला केंद्र सरकारनं मंजुरी दिली आहे. आंध्र प्रदेशात खरेदीची मुदत पंधरा दिवस वाढवायला केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी मान्यता दिली आहे.

**<><><><>**

जागतिक बाजारातलं कमजोर वातावरण तसंच इराण आणि अमेरिकेत वाढलेल्या तणावामुळे देशातल्या शेअर बाजारात मोठी घसरण झाली. सेन्सेक्स ८२३ अंकांनी घसरुन ८१ हजार ६९२ अंकांवर बंद झाला. निफ्टी २५३ अंकांची घट नोंदवून २४ हजार ८८८ अंकांवर स्थिरावला. बांधकाम उद्योग, तेल आणि नैसर्गिक वायू, ऊर्जा, बँका यासह सर्वच क्षेत्रातल्या कंपन्यांचे समभाग आज घसरले.

**<><><><>**

यंदा आंतरराष्ट्रीय योग दिन सोहळ्यात येत्या २१ तारखेला सकाळी साडे सहा ते ७ वाजून ४० मिनिटं या वेळेत एक लाखाहून अधिक योग कार्यक्रम एकाच वेळी आयोजित केले जातील, अशी घोषणा केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली. ते आज नवी दिल्लीत यंदाच्या योग दिनाच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या वार्ताहर परिषदेत बोलत होते. यंदाची योग दिनाची संकल्पना एक पृथ्वी - एक स्वास्थ के लिए योग अशी आहे. यंदाचा मुख्य कार्यक्रम आंध्र प्रदेशात विशाखा पट्टणम इथं होणार असून या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सहभागी होतील. त्यांच्यासह सुमारे ४० देशांचे प्रतिनिधी देखील या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत, अशी महिती जाधव यांनी दिली. यंदा साजऱ्या होणाऱ्या या विशेष योग संगमासाठी देशभरातल्या ६५ हजारांहून अधिक संघटनांनी नोंदणी केली आहे. दिल्लीत लाल किल्ला, कर्तव्य पथ आणि लोधी बाग यासह १११ ठिकाणी योगदिन साजरा करण्यात येणार आहे, असंही जाधव यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

जागतिक क्रिकेट कसोटी स्पर्धेच्या विजेतेपदासाठी लंडनमधे सुरु असलेल्या सामन्यात, ऑस्ट्रेलियानं पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेवर ७४ धावांची आघाडी मिळवली आहे. काल पहिल्या दिवशी प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव २१२ धावांवर संपला. आज दुसऱ्या दिवशी दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव १३८ धावांवर आटोपला. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स यानं ६ बळी घेत आफ्रिकेच्या फलंदाजीला खिंडार पाडलं. त्यामुळे ऑस्ट्रेलियानं दक्षिण आफ्रिकेचा डाव लवकर गुंडाळता आला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या, दुसऱ्या डावात २ बाद ३२ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

जम्मू-काश्मीरच्या ६ जिल्ह्यांमधे आज उष्णतेची लाट होती. सांबा शहरात ४६ पूर्णांक ३ अंश तर जम्मू शहरात साडे ४४ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

**<><><><>**

बांगलादेशात ८ जूनला सिराजगंज इथं रविंद्रनाथ टागोर यांच्या घराची तोडफोड झाल्याबद्दल भारतानं तीव्र निषेध केला आहे. सहिष्णुतेची प्रतीकं पुसून टाकण्याच्या आणि बांगलादेशाचा सांस्कृतिक वारसा खंडीत करण्याचा प्रयत्न अतिरेक्यांकडून पद्धतशीरपणे केला जातोय, त्याचाच हा भाग असल्याची टीका परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी केली आहे.

**//<><><><>//**